॥ वसुधैव कुटुम्बकम् ॥

# SYMBIOSIS SKILLS & OPEN UNIVERSITY

## Bhoomi Poojan & Foundation Stone Laying Ceremony

### *of State's 1st Skill Development & Open University*

at Kiwale, Pune | Friday, 27th November, 2015

At the auspicious hands of

## Hon. Shri. Devendra Fadnavis

Chief Minister of Maharashtra

**PRESS COVERAGE**

THE TIMES OF INDIA

# CM looks at skilled hands making global impact

Times News Network

**Pune:** The country has a huge potential for skill development and the need of the hour is to train young manpower, said chief minister Devendra Fadnavis at the foundation laying ceremony of the Symbiosis Skills and Open University here on Friday.

The new university in Kiwale, near Pune is spread over 15 acres. It will offer degree, diploma and certificate courses in sectors such as automobile, construction, manufacturing, logistics, retail, banking, IT, beauty and wellness, among others.

The university will start operations from the 2016 academic year and will enroll around 10,000 students every year. The university will also include on its premises a centre for excellence, labs, simulation software and training workshops.

Fadnavis added that while the population in developed countries is growing old, India has 50% of the population below the age of 25. "This provides a great opportunity for us to establish a global footprint, as by 2020, the average age of a citizen in Eastern Europe would be 44, Western Europe 41, Japan 48, USA 37 and China 9," he said. "The country will be able to enjoy this demographical advantage till the year 2035," he added.

**SYMBIOSIS SKILLS & OPEN UNIVERSITY**

Minister for higher and technical education Vinod Tawde, guardian minister Girish Bapat, former minister for higher and technical education Rajesh Tope, and mayor of Pimpri Chinchwad Municipal Corporation (PCMC) Shakuntala Darade were present.

Fadnavis added that if they failed to give employment to 60 crore youths, who were ready to work for a livelihood, it could be a demographic disaster.

"There are many artisans working from rural areas in Maharashtra, but if they could be given skill certificates, they can earn global recognition and tap the market through the internet," said Tawde, while speaking at the event.

Bapat said that the first such university was a great step, many more should be opened across India.

Swati Mujumdar, principal director, Symbiosis Open Education Society, said, "Memoranda of understanding have been signed with more than 15 companies such as HDFC, Reliance Capital, Future Group, L&T and MAAN Trucks."

The society has invested Rs 200 crore in the project, she added. The Skills and Open University at Kiwale will also have a community college and a vocational and employment guidance cell which will offer guidance and livelihood related courses for local farmers, women and school dropouts. Symbiosis is also setting up a Skill Development University in Indore, Madhya Pradesh.

Fadnavis also inaugurated a web portal edutourism.com, which will provide information to students planning to come to the city for education, such as accommodation, universities and colleges present, food and transportation among others.

आज का आनंद पुणे
शनिवार, 28 नवंबर 2015

# स्किल डेवलपमेंट की शिक्षा देने पर भारत सर्वश्रेष्ठ राष्ट्र बनेगा

## किवले में सिंबायोसिस के स्किल्स एंड ओपन यूनिवर्सिटी का भूमिपूजन करते हुए देवेंद्र फडणवीस ने कहा

**पुणे, 27 नवंबर (आ.प्र.)**

भारत में मानव संसाधन का सही इस्तेमाल करने के लिए इसका कौशल विकास (स्किल्स डेवलपमेंट) करना होगा. इससे हमारी अतिरिक्त आबादी लाभ में रूपांतरित होगी. आज जापान, चीन, अमेरिका सहित दुनिया के प्रमुख देशों में आबादी बुढ़ापे की ओर झुकी है. वहीं भारत सबसे आबादीवाला और युवाओं का देश है. इसलिए इन युवाओं को स्किल डेवलपमेंट का प्रशिक्षण देने पर भारत दुनिया का सर्वश्रेष्ठ राष्ट्र बन सकता है. यह विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने पुणे में व्यक्त किया.

पुणे के पास किवले में सिंबायोसिस के स्किल्स एंड ओपन यूनिवर्सिटी के भूमिपूजन करने के बाद वे बोल रहे थे. इस अवसर पर खाद्य और नागरिक आपूर्ति मंत्री गिरीश बापट, उच्च व तकनीकी शिक्षामंत्री विनोद तावड़े, पूर्व उच्च शिक्षा

**▸ इस स्किल्स डेवलपमेंट सेंटर से किवले विश्व नक्शे पर आएगा : गिरीश बापट**

तकनीकी मंत्री राजेश टोपे, सिंबायोसिस के संस्थापक अध्यक्ष डॉ. एस.बी. मुजूमदार, विधायक बाला भेगड़े, सिंबायोसिस के मुक्त शिक्षा संस्था की चीफ डायरेक्टर डॉ. स्वाति मुजूमदार व अण्णा महाराज आदि प्रतिष्ठित व्यक्ति उपस्थित थे.

मुख्यमंत्री ने आगे कहा कि स्किल डेवलपमेंट समय की जरूरत है. स्किल डेवलपमेंट पर बोलने की बजाय कार्यों के द्वारा सिंबायोसिस ने स्किल्स एंड ओपन डीम्ड यूनिवर्सिटी को साकार करने का काम शुरू किया है. यह इस तरह की देश में पहली यूनिवर्सिटी है और भविष्य में देश के लिए रोल मॉडेल बनेगी. यह विश्वास उन्होंने व्यक्त किया. उन्होंने




**किवले (पुणे) में सिंबायोसिस के स्किल्स एंड ओपन यूनिवर्सिटी के भूमिपूजन समारोह में मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस को सम्मानित करते हुए डॉ. एस.बी. मुजूमदार. इस अवसर पर पालकमंत्री गिरीश बापट, शिक्षामंत्री विनोद तावड़े, राजेश टोपे, डॉ. स्वाति मुजूमदार आदि उपस्थित थे.**

कहा कि सिंबायोसिस ने प्रतिष्ठित 20 कंपनियों के साथ समझौता किया है. यह बहुत प्रशंसनीय है. नागपुर में भी सिंबायोसिस स्किल्स एंड डेवलपमेंट सेंटर शुरू करेगा. इसमें सरकार संपूर्ण सहयोग देगी. गिरीश बापट ने कहा कि समय की मांग को समझकर सिंबायोसिस ने स्किल्स एंड ओपन यूनिवर्सिटी शुरू करने का निर्णय लिया. इससे देश और राज्य के विकास में मदद मिलेगी. स्किल डेवलपमेंट सेंटर से किवले गांव भी दुनिया के नक्शे पर आएगा.

श्री तावड़े ने कहा कि सिंबायोसिस इस सेंटर से और स्किल्स पर आधारित पाठ्यक्रम से रोजगार के कई अवसर उपलब्ध होंगे. इसके साथ हम अंतर्राष्ट्रीय मार्केट में भी उतर सकेंगे. गांव-देहातों में लाखों कारीगार हैं. उनके कौशल को प्रमाणित करने की जरूरत है. भविष्य में सिंबायोसिस जैसी संस्थाएं खड़ी रहें. यह इस अवसर पर डॉ. स्वाति मुजूमदार द्वारा बनाई गई वेबसाइट www.edutourism.in का मुख्यमंत्री के हाथों लोकार्पण किया गया. यह वेबसाइट पुणे में शिक्षा हेतु आने वाले छात्रों के लिए मार्गदर्शक बनेगी. डॉ. स्वाति मुजूमदार ने कार्यक्रम का प्रास्ताविक भाषण दिया और डॉ. एस.बी. मुजूमदार ने आभार ज्ञापन दिया.

महाराष्ट्र टाइम्स, पुणे ▪ शनिवार, २८ नोव्हेंबर २०१५



सिम्बायोसिसच्या कौशल्य विकास व मुक्त विद्यापीठाचे भूमिपूजन शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. या वेळी (डावीकडून) पालकमंत्री गिरीश बापट, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, सिम्बायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार आणि सिम्बायोसिस मुक्त शिक्षण सोसायटीच्या प्रधान संचालिका स्वाती मुजुमदार आदी उपस्थित होते.

# विकासाची संधी गमावणे न परवडणारे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'देशातील ८० कोटी युवकांना कौशल्य शिक्षण देऊन रोजगार दिला नाही तर युवकांच्या शक्तीचे रूपांतर समस्येमध्ये होईल. विकासाची संधी साधण्यासाठी आपल्याकडे फार वेळ नाही, कारण विकासाच्या संधीचा पहिला टप्पा २०२० मध्ये, तर दुसरा टप्पा २०३५ मध्ये संपणार आहे. त्यानंतर ही संधी आफ्रिकेतील राष्ट्रांना उपलब्ध होईल व जगात त्यांचाच बोलबाला असेल,' असे भाकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी वर्तवले. देशात २०२० पर्यंत ५२ कोटी लोक कौशल्य प्रशिक्षित करणे अपेक्षित असताना दहा टक्केदेखील प्रशिक्षित झाले नाही, अशी कबुली त्यांनी दिली. किवळे येथील देशातील पहिल्या सिम्बायोसिस कौशल्य विकास व मुक्त विद्यापीठाची पायाभरणी आणि कोनशिला समारंभ मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाला, त्या वेळी ते बोलत होते. शिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री गिरीश बापट, माजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री राजेश टोपे, मावळचे आमदार बाळा भेगडे, विद्यापीठाचे संस्थापक-कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार व सिम्बायोसिस मुक्त शिक्षण सोसायटीच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार या वेळी उपस्थित होते. देश संक्रमणातून जात असताना लोकसंख्येचे रूपांतर मनुष्यबळात केले तर जगामध्ये हे ठळक काम होईल, असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, 'जगातील देश वार्धक्याकडे झुकत असताना भारत अधिक तरुण होणार आहे. युवकांना कौशल्य देऊन प्रशिक्षित केले तर जगाला आपण मनुष्यबळ पुरवू व त्यामुळे सर्वोत्तम राष्ट्र हे स्वप्न सत्यात येईल. लोकसंख्या व रोजगार यातील दरी कमी करावी लागेल. ग्रामीण भागातील लोकांकडे असणारे कौशल्य आपण अधिकृत करत नाहीत व पारंपरिक शिक्षणातून बाहेर पडत नाहीत तोपर्यंत हे शक्य नाही.'

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

'कौशल्य विकासासाठी गुंतवणूक आवश्यक असून देशातील पहिले सिम्बायोसिस कौशल्य विद्यापीठ कौशल्य शिक्षणाचे देशात मॉडेल ठरेल,' असे गौरवोद्‌गार त्यांनी काढले. पारंपरिक महाविद्यालयांना परवानगी देऊ नका, अशी मागणी डॉ. मुजुमदार यांनी मुख्यमंत्री व शिक्षणमंत्री यांच्याकडे केली. कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना डोळे झाकून परवानगी द्या, असे ते म्हणाले.

## 'कौशल्य शिक्षणाला प्रतिष्ठा गरजेची'

'बेकार पदवीधर जावई, सून आपल्याला चालते; पण कौशल्यातून पैसे कमावणारा जावई व सून चालत नाही, त्यामुळे कौशल्य शिक्षणाला प्रतिष्ठा देण्याची गरज आहे,' याकडे विनोद तावडे यांनी लक्ष वेधले. राजकारणातील आजची पिढी राजकारण करायचे तेव्हा करते, पण विकासाच्या मुद्द्यावर राजकारण सोडून सत्ताधारी व विरोधक एकत्र येतात, असा दावा त्यांनी केला.

पुढारी | पुणे, शनिवार २८ नोव्हेंबर २०१५

# लोकसंख्येचे परिवर्तन कुशल मनुष्यबळात होणे गरजेचे

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मत

**पुणे :** तरूणांच्या हाताला जर काम नसेल, तर वाढत्या लोकसंख्येचे रुपांतर राष्ट्रीय आपत्तीमध्ये होईल. देशाची लोकसंख्या ही आपत्ती नसून संपत्ती आहे. त्याचे परिवर्तन कुशल मनुष्यबळामध्ये करणे ही काळाची गरज असल्याचे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

'सिंबायोसिस कौशल्य विकास व मुक्त विद्यापीठा'च्या भूमिपूजन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री विनोद तावडे, पालकमंत्री गिरीश बापट, डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. स्वाती मुजुमदार, राजेश टोपे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, "जगातील सर्व देशांची लोकसंख्या २०२० साली वार्धक्याकडे झुकलेली असेल, त्यावेळी सर्वाधिक तरूणांचा देश भारत असणार आहे. त्यामुळे देशातील तरूणांना कौशल्याधारीत अभ्यासक्रम शिकवून कुशल मनुष्यबळ जगाला पुरविण्याची सुवर्णसंधी असणार आहे.

रोजगार आणि लोकसंख्येमधील दरी कमी करण्यासाठी कौशल्य विकास विद्यापीठांची गरज आहे. त्यामध्ये लोकसहभाग आणि औद्योगिक सहभागही वाढविला पाहीजे."

विनोद तावडे म्हणाले, "पारंपरिक शिक्षणव्यवस्थेमुळे कौशल्याच्या बळावर पैसा कमविणाऱ्यांना प्रतिष्ठा मिळत नाही, कौशल्याधारीत शिक्षण व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे."

पालकमंत्री गिरीश बापट म्हणाले, "ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारीत विद्यापीठे आवश्यक आहेत. किवळे गावाचे नाव सिंबायोसीस कौशल्य मुक्त विद्यापीठांमुळे देशपातळीवर जाईल."

डॉ. मुजुमदार म्हणाले, जागतिकीकरणामुळे कौशल्यावर आधारीत नव्या शिक्षण पद्धतीची गरज आहे. लोकसंख्या लाभांशासाठी दूरस्थ, कौशल्य विकास मुक्त विद्यापीठाची सिंबायोसीसने स्थापना केली आहे.

डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, "किवळे येथील पंधरा एकरवर दोनशे कोटी रुपयांची गुंतवणूक करून वर्षभरात कौशल्य विकास मुक्त विद्यापीठ उभारले जाईल. दहा हजार विद्यार्थ्यांना कौशल्याधारीत प्रशिक्षण आणि व्यवसाय उभारणीसाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे."

या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. स्वाती मुजुमदार यांनी केले, तर सूत्रसंचालन श्रद्धा कुलकर्णी यांनी केले. एज्युटुरीझम या संकेतस्थळाचे उद्घाटन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले.



कौशल्य विकास व मुक्त विद्यापीठाच्या भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी विनोद तावडे, गिरीश बापट, डॉ. मुजुमदार, डॉ. स्वाती मुजुमदार, राजेश टोपे आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी
पुणे
शनिवार, २८ नोव्हेंबर २०१५

# कौशल्य प्रशिक्षणात देश पिछाडीवर

## सिम्बॉयसिसच्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांची कबुली

**पुणे : प्रतिनिधी**

देशात २०२० पर्यंत ५२ कोटी लोक कौशल्य प्रशिक्षित करणे अपेक्षित असताना सध्या १० टक्केदेखील प्रशिक्षित झाले नसल्याची कबुली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात दिली.

देशातील पहिल्या सिम्बायोसिस कौशल्य विकास आणि मुक्त विद्यापीठाचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. शिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री गिरीश बापट, आमदार बाळा भेगडे, माजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री राजेश टोपे, विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. शां. ब. मुजूमदार, प्रधान संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, सिम्बायोसिस कौशल्य विकास आणि मुक्त विद्यापीठाच्या संचालिका स्वाती मुजूमदार, अण्णा महाराज आदी यावेळी उपस्थित होते.



मुख्यमंत्री म्हणाले, देशातील ८० कोटी युवकांना कौशल्य शिक्षण देऊन रोजगार दिला नाही तर युवाशक्तीचे रूपांतर समस्येमध्ये होईल. देश संक्रमणातून जात असून, लोकसंख्येचे रूपांतर मनुष्यबळात करणे गरजेचे आहे. आज जगातील जपान, चीन, अमेरिका या काही प्रमुख देशांतील लोकसंख्या वार्धक्याकडे झुकलेली आहे. भारत हा सर्वाधिक लोकसंख्येचा आणि तरुणांचा देश आहे. राष्ट्राच्या विकासासाठी संधी साधण्यासाठी आपल्याकडे फार वेळ नाही, कारण विकासाच्या संधीचा पहिला टप्पा २०२०, तर दुसरा टप्पा २०३५ मध्ये संपणार आहे. त्यानंतर ही संधी आफ्रिकन राष्ट्रांना उपलब्ध होईल. त्यामुळे तरुणांना कौशल्य विकासाचे शिक्षण मिळाले, तर भारत जगातील सर्वोत्तम राष्ट्र बनू शकेल, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तावडे म्हणाले, बेकार पदवीधर जावई, सून आपल्याला चालते, पण कौशल्यातून पैसे कमावणारा जावई व सून चालत नाही. कौशल्य शिक्षणाला प्रतिष्ठा देण्याची गरज आहे. राजकारणातील आजची पिढी राजकारण करायचे तेव्हा करते, पण विकासाच्या मुद्यावर राजकारण सोडून सत्ताधारी व विरोधक एकत्र येतात, असेही त्यांनी सांगितले. बापट म्हणाले, कौशल्य विकास व मुक्त विद्यापीठ ही काळाची गरज आहे. या विद्यापीठांमुळे तरुणांच्या हाताला काम तर मिळेलच, त्याचबरोबर राज्याच्या आणि देशाच्या विकासाला हातभार लागणार आहे.

डॉ. शां. ब. मुजूमदार म्हणाले, सरकारने पारंपरिक महाविद्यालयांना परवानगी न देता कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा व महाविद्यालयांच्या संख्येत वाढ करायला हवी.

II लोकमत पुणे, शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०१५
पुणे शहर



सिम्बायोसिसच्या विकास व मुक्त विद्यापीठाच्या कोनशिला अनावरणप्रसंगी (डावीकडून) डॉ. संजीवनी मुजुमदार, डॉ. शां. ब. मुजुमदार, विनोद तावडे, देवेंद्र फडणवीस, गिरीश बापट, स्वाती मुजुमदार.

# कौशल्यविकासाच्या आधारे सर्वोत्तम राष्ट्र होण्याची संधी

## मुख्यमंत्री : सिम्बायोसिस कौशल्य आणि मुक्त विद्यापीठाचे भूमिपूजन

**पुणे :** सध्या जगात आपल्या देशात सर्वाधिक तरुणांची संख्या आहे. त्यामुळे आपल्या या लोकसंख्येच्या लाभांशाचे कौशल्य अभ्यासक्रमांद्वारे प्रशिक्षित मानवसंसाधानात रुपांतर करण्याची मोठी संधी आहे. वार्धक्याकडे झुकलेल्या देशांना जर आपण कौशल्यपूर्ण मानव संसाधन पुरवू शकलो, तर आपले सर्वोत्तम राष्ट्र होण्याचे स्वप्न पूर्ण होऊ शकते. तसेच जर आपण कौशल्यांचा विकास करून रोजगारनिर्मितीत असफल ठरलो आणि तरुणाई वाममार्गाला लागली तर हेच लाभांश संकट ठरू शकते, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

किवळे येथे सिम्बायोसिस कौशल्यविकास व मुक्त विद्यापीठाची पायाभरणी व कोनशिला अनावरण कार्यक्रम मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी शिक्षणमंत्री विनोद तावडे, अन्नधान्य पुरवठामंत्री गिरीश बापट, माजी शिक्षण मंत्री राजेश टोपे, आमदार बाळा बेगडे, सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार व्यासपीठावर उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, की कौशल्य प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. भारतासाठी ती अधिक महत्त्वाची आहे. २०२०मध्ये भारताचे सरासरी वय २९ असणार आहे. त्यामुळे आपल्याकडे असणाऱ्या मर्यादित वेळेत आपल्याला योग्यरीतीने पावले उचलून लोकसंख्येला अधिक प्रशिक्षित करून त्यांना अर्थव्यवस्थेत सामावून घ्यायचे आहे.

तावडे म्हणाले, की कौशल्य विकासामध्ये पैसा आहे; मात्र अद्यापही प्रतिष्ठा नाही. समाजाने कौशल्याधिष्ठित तरुणांना प्रतिष्ठा मिळवून देणे गरजेचे आहे. कौशल्य विकासासमोर सामाजिक मान्यतेचे मोठे आव्हान आहे. स्वाती मुजुमदार यांनी प्रास्ताविक केले. श्रद्धा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. (प्रतिनिधी)

### ई-फीत क्लिक करून उद्घाटन

- तंत्रस्नेही जमान्यात तंत्रज्ञानाच्या आधारे आकाशाला गवसणी घालणारे उपक्रम केले जातात. मात्र, त्यांचे उद्घाटन पारंपरिक फीत कापल्याशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. मात्र या तंत्रज्ञानाच्या जगात फीत कापण्याची कलाही तंत्रज्ञानानेच साध्य केली तर...? सिंबायोसिस कौशल्यविकास व मुक्त विद्यापीठाची पायाभरणी कार्यक्रमावेळी 'एज्युटुरिझम' या संकेतस्थळाचे मुख्यमंत्र्यांनी लॅपटॉपवरील ई-फीत ई-कात्रीने कापून उद्घाटन केले.
- राजकारणातील सध्याची पिढी ही राजकारणाच्या वेळी राजकारण करते आणि विकासाच्या वेळी विकास. विकासाच्या मुद्यांमध्ये राजकारणाचा अडसर निर्माण करत नाही. त्यामुळे विकासात अडथळे येणार नाहीत, असे तावडे यांनी सांगितले.

सकाळ
पुणे, शनिवार,
२८ नोव्हेंबर २०१५
४

# कौशल्य विकासात उद्योगांचा सहभाग आवश्यक : मुख्यमंत्री

**पुणे, ता. २७ :** 'देशातील ५२ टक्के लोकांना २०२० पर्यंत कौशल्यपूर्ण करण्याचे उद्दिष्ट केंद्रातील मागच्या सरकारने ठेवले होते. मात्र, आतापर्यंत दहा टक्केदेखील काम पूर्ण झालेले नाही. हे काम केवळ सरकार करू शकत नाही. त्यासाठी खासगी उद्योगांना सहभागी करून घ्यावे लागेल', असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. देशातील तरुणांच्या हाताला काम दिले नाही, तर ही शक्ती विध्वंसक ठरू शकते, अशी चिंताही त्यांनी व्यक्त केली.

किवळे येथे सिंबायोसिस कौशल्य आणि मुक्त विद्यापीठाच्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी फडणवीस बोलत होते. पालकमंत्री गिरीश बापट, शिक्षणमंत्री विनोद तावडे, आमदार बाळा भेगडे, नारायणपूरचे नारायणमहाराज, माजी मंत्री राजेश टोपे, सिंबायोसिसचे डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. स्वाती मुजुमदार आदी या वेळी उपस्थित होते.

फडणवीस म्हणाले, "जगातील प्रगत देश वार्धक्याकडे झुकतील, त्या वेळी सर्वाधिक तरुण प्रशिक्षित मनुष्यबळ भारताकडे असेल. ते जगाला पुरवले, तर भारताचे सर्वोत्तम राष्ट्राचे स्वप्न पूर्ण होऊ शकेल. तरुणांच्या हाताला काम दिले नाही, तर तो देशासाठी विध्वंसक ठरू शकतो. याचा वापर कमी काळात आपल्याला करून घ्यावा लागेल."

डॉ. मुजुमदार यांनी पारंपरिक पदव्या देणाऱ्या विद्यापीठांवर टीका केली. या विद्यापीठांनी केवळ पदवीधर निर्माण करून बाबू, कारकून तयार केले. हा शिक्षण व्यवस्थेचा पराभव असल्याचे त्यांनी सांगितले. स्वाती मुजुमदार यांनी प्रास्ताविक केले.

**कारागिरांना पदवीचे पाठबळ हवे**

"कौशल्य विकास हा आजचा परवलीचा शब्द झाला आहे. यात पैसा आहे; पण प्रतिष्ठा नाही. कौशल्य विकासाची विद्यापीठे तयार झाली तर त्यात शिक्षण घेतलेल्यांचा समाजाकडून स्वीकार होईल. सध्या बेरोजगार पदवीधरांना मान्यता आहे. मात्र, कौशल्ये मिळवून चांगला पैसा कमावणाऱ्या व्यक्तीला सन्मान मिळत नाही. समाजाने ही मानसिकता बदलली पाहिजे. वंश परंपरागत कौशल्य असलेल्या कारागिरांना पदवी, पदविकांचे पाठबळ मिळाले, तर त्यांना जगाच्या बाजारपेठेत चांगली किंमत मिळेल. दूरशिक्षणाद्वारे त्यांना शिक्षणाशी जोडता येईल", असे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी सांगितले.

केसरी
पुणे, २८ नोव्हेंबर २०१५/३

# तर युवकांच्या शक्तीचे रूपांतर समस्येमध्ये होईल : मुख्यमंत्री

**पुणे** : देशातील ८० कोटी तरुणांना कौशल्य शिक्षण देऊन रोजगार दिला नाही तर युवकांच्या शक्तीचे रुपांतर समस्येमध्ये होईल. संधी साधण्यासाठी आपल्याकडे फार वेळ नाही कारण विकासाच्या संधीचा पहिला टप्पा २०२०, तर दुसरा टप्पा २०३५ मध्ये संपणार आहे. त्यानंतर ही संधी आफ्रिकन राष्ट्रांना उपलब्ध होईल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

सिंबायोसिसच्या कौशल्य आणि मुक्त विद्यापीठाच्या भूमिपूजन आणि कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी डॉ. स्वाती मुजुमदार यांनी बनविलेल्या www.edu-toursim.in या संकेतस्थळाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, शिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री गिरीष बापट व माजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री राजेश टोपे, सिम्बॉयसिस मुक्त शिक्षण संस्थेच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार, आमदार बाळा भेगडे, अण्णा महाराज यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, देशाच्या मनुष्यबळाचा योग्य वापर करावयाचा असेल तर या मनुष्यबळाचा कौशल्य विकास करणे अत्यंत गरजेचे आहे. जगातील देश वार्धक्याकडे झुकत असताना भारत अधिक तरुण होणार आहे. युवकांना कौशल्य देऊन प्रशिक्षित केले तर जगाला आपण मनुष्यबळ पुरवू व त्यामुळे सर्वोत्तम राष्ट्र हे स्वप्न सत्यात येईल. लोकसंख्या व रोजगार यातील दरी कमी करावी लागेल. ग्रामीण भागातील लोकांकडे असणारे कौशल्य आपण अधिकृत करत नाहीत व पारंपरिक शिक्षणातून बाहेर पडत नाहीत तोपर्यंत हे शक्य नाही. कौशल्य विकासासाठी गुंतवणूक आवश्यक असून केवळ भाषणातून ते होणार नाही. देशात २०२० पर्यंत ५२ कोटी लोक कौशल्य प्रशिक्षित करणे अपेक्षित असताना १० टक्के देखील प्रशिक्षित झाले नाही, अशी कबुली त्यांनी दिली.



सिंबायोसिसच्या कौशल्य आणि मुक्त विद्यापीठाच्या भूमिपूजन आणि कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी गिरीष बापट, विनोद तावडे, विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, संस्थेच्या प्रधान संचालिका डॉ. स्वाती मुजुमदार, डॉ. संजीवनी मुजुमदार, विद्या येरवडेकर उपस्थित होते.

बेकार पदवीधर जावई, सून आपल्याला चालते पण कौशल्यातून पैसे कमावणारा जावई व सून चालत नाही, त्यामुळे कौशल्य शिक्षणाला प्रतिष्ठा देण्याची गरज असल्याकडे तावडे यांनी लक्ष वेधले.

राजकारणातील आजची पिढी राजकारण करायचे तेव्हा करते पण विकासाच्या मुद्द्यावर राजकारण सोडून सत्ताधारी व विरोधक एकत्र येतात, असेही ते म्हणाले. पारंपरिक महाविद्यालयांना परवानगी देऊ नका, अशी मागणी डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी मुख्य मंत्री व शिक्षणमंत्री यांच्याकडे केली. कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा व महाविद्यालयांना डोळे झाकून परवानगी द्या, असे ते म्हणाले.

सामना
३ पुणे शहर
शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०१५

# ... तर हिंदुस्थान सर्वोत्तम राष्ट्र होईल – मुख्यमंत्री

पुणे, दि. २७ (प्रतिनिधी) – हिंदुस्थान हा तरुणांचा देश आहे. विकासाच्या संधीचा पहिला टप्पा २०२०, तर दुसरा टप्पा २०३५ मध्ये संपणार आहे. त्यानंतर ही संधी आफ्रिकन राष्ट्रांना उपलब्ध होईल. त्यामुळे तरुणांना कौशल्यविकासाचे शिक्षण मिळाले, तर हिंदुस्थान जगातील सर्वोत्तम राष्ट्र बनू शकेल, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. तसेच, देशात २०२० पर्यंत ५२ कोटी लोक कौशल्यप्रशिक्षित करणे अपेक्षित असताना, १० टक्केदेखील प्रशिक्षित झाले नसल्याची कबुलीही त्यांनी यावेळी दिली.

देशातील पहिल्या सिम्बायोसिस कौशल्यविकास आणि मुक्त विद्यापीठाचे भूमिपूजन मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. शिक्षणमंत्री विनोद तावडे, पालकमंत्री गिरीश बापट, आमदार बाळा भेगडे, माजी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री राजेश टोपे, विद्यापीठाचे संस्थापक कुलपती डॉ. शां. ब. मुजुमदार, प्रधान संचालिका डॉ. विद्या येरवडेकर, सिम्बायोसिस कौशल्यविकास आणि मुक्त विद्यापीठाच्या संचालिका स्वाती मुजूमदार, अण्णा महाराज आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी www.edutoursim.in या संकेतस्थळाचे उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.



**सिम्बायोसिस कौशल्यविकास आणि मुक्त विद्यापीठाच्या कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. विद्या येरवडेकर, डॉ. शां. ब. मुजुमदार, विनोद तावडे, स्वाती मुजुमदार, राजेश टोपे, गिरीश बापट, संजीवनी मुजुमदार आदी यावेळी उपस्थित होते.**

मुख्यमंत्री म्हणाले, देशातील ८० कोटी युवकांना कौशल्य शिक्षण देऊन रोजगार दिला नाही, तर युवा शक्तीचे रूपांतर समस्येमध्ये होईल. युवकांना कौशल्य देऊन प्रशिक्षित केले, तर जगाला आपण मनुष्यबळ पुरवू व त्यामुळे सर्वोत्तम राष्ट्राचे आपले स्वप्न सत्यात उतरेल.

तावडे म्हणाले, कौशल्य शिक्षणाला प्रतिष्ठा देण्याची गरज आहे. राजकारणातील आजची पिढी राजकारण करायचे तेव्हा करते; पण विकासाच्या मुद्यावर राजकारण सोडून सत्ताधारी व विरोधक एकत्र येतात.

बापट म्हणाले, कौशल्यविकास विद्यापीठांमुळे तरुणांच्या हाताला काम तर मिळेलच; त्याचबरोबर राज्याच्या आणि देशाच्या विकासाला हातभार लागणार आहे.

डॉ. मुजुमदार म्हणाले, सरकारने कौशल्य शिक्षण देणाऱ्या शाळा व महाविद्यालयांच्या संख्येत वाढ करायला हवी.

पुणे नवभारत प्लस
पुणे, शनिवार, 28 नवंबर, 2015 ■ तापमान : 29.0-17.1 डि. से.

# कौशल विकास से भारत होगा नं.-1



**कौशल विकास ओपन यूनिवर्सिटी का भूमिपूजन सीएम ने किया**

**पुणे.** भारत देश सर्वाधिक जनसंख्या और युवा पीढ़ी का देश है. हमारे देश की युवा पीढ़ी को कौशल विकास की उचित शिक्षा मिले, तो विश्व में भारत सर्वोत्तम राष्ट्र बन जाएगा. ऐसा प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ने यहां किया किया. मेक इन इंडिया मुहिम के अंतर्गत कौशल विकास का उद्देश्य सामने रखकर सिंबायोसिस की वाइस प्रेसिडंट स्वाति मुजुमदार के नेतृत्व में कौशल विकास ओपन यूनिवर्सिटी की स्थापना पुणे स्थित किवले में की गई है. इस वास्तु का भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस के हाथों किया गया. इस अवसर पर सिंबायोसिस के फाउंडर शां. ब. मुजुमदार, संचालक डॉ. स्वाति मुजुमदार, शिक्षा मंत्री विनोद तावड़े, पुणे के पालकमंत्री गिरीश बापट, विधायक राजेश टोपे, पिंपरी-चिंचवड़ की महापौर शकुंतला धराडे आदि उपस्थित थे.

**फडणवीस ने बताया कि सिंबायोसिस द्वारा निर्माण किया जा रहा यह कौशल विकास विद्यापीठ भविष्य में देश का रोल मॉडल बन सकता है. कौशल विकास समय की मांग है. युवा पीढ़ी को कौशल विकास की शिक्षा देकर अपने पैर पर खड़ा करना चाहिए. इसी कौशल विकास की जरूरत को जानकर सिंबायोसिस ने 20 कंपनियों के साथ करार किया है. यह बात उल्लेखनीय है.**

## नागपुर में भी बनेगा कौशल विकास केंद्र

मुख्यमंत्री ने कहा कि कौशल शिक्षा को प्रमाणित करना जरुरी है. कौशल विकास ने पारंपारिक शिक्षा के पास आने का मार्ग खुला किया है. सिंबायोसिस द्वारा नागपुर में बनाये जानेवाले कौशल विकास केंद्र को सरकार की ओर से सहकार्य किया जाएगा. टाटा, समाज विज्ञान जैसी संस्थाए भी कौशल विकास क्षेत्र में आ रहीं है. इन संस्थाओं को सरकार की ओर से मदद की जाएगी.

शिक्षा मंत्री विनोद तावड़े ने बताया कि सिंबायोसिस द्वारा शुरू किए गए कौशल विकास पर आधारित पाठ्यक्रम की वजह से विद्यार्थी, युवा पीढ़ी को रोजगार के कई अवसर उपलब्ध होंगे. साथ ही विश्व बाजारपेठ खुली होगी.

इसी कार्यक्रम में स्वाति मुजुमदार द्वारा बनाई गई EDU-TOURISM- www.edutourism.in वेबसाइट का विमोचन भी मुख्यमंत्री के हाथों किया गया. इस वेबसाइट को विद्यार्थियों के लिए बनाया गया है. इस वेबसाइट पर शैक्षणिक सुविधा, स्वास्थ्य सुविधा, हास्टल, कैंटिन आदि के बारे में पूरी जानकारी दी गई है.

WWW.INDIANEXPRESS.COM
**THE INDIAN EXPRESS,** SATURDAY, NOVEMBER 28, 2015

# Skill development need of the hour: Fadnavis

**EXPRESS NEWS SERVICE**
PUNE, NOVEMBER 27



**Chief Minister Devendra Fadnavis at Symbiosis Open Education Society.** *Express Photo*

STRESSING THE importance of skill development, Maharashtra Chief Minister Devendra Fadnavis said if the country failed to capitalise on the opportunities provided by its demographic advantage, the same can turn into a "demographic disaster".

Fadnavis was speaking at an event on the city's outskirts where he laid the foundation stone of a proposed 'Skills and Open University' by Symbiosis. Also present at the occasion were Technical and Higher Education Minister Vindo Tawade, Food Supply Minister and Pune's Guardian Minister Girish Bapat, former cabinet minister Rajesh Tope and S B Mujumdar, President, Symbiosis.

Fadnavis said that skill development was the need of the hour and it held special significance in the Indian context as the country is going through a favourable demographic phase.

"Today, 50 per cent of the population is below 25 years of age. In 2020, when the average age of a citizen would be 29 years, in Japan it would be 48, in Eastern Europe 44, for Western Europe 41, in China 49 and for USA 37. This means that all the developed countries in the world are growing old. However, the need of skilled human resources is going to keep growing. This is a golden opportunity for us. If we could fulfill this need of the world, there will be no stopping us from becoming a superpower," said Fadnavis.

Fadnavis pointed out that the country will enjoy the demographic advantage till 2035, after which the dividend will incline towards the African countries. "On one hand, it's an opportunity, on the other it's also a challenge. The demographic dividend if not taken care of properly could also become a demographic disaster. There are 60 to 70 crore youngsters who want to earn their livelihood. They want work. If we failed to give them employment, the situation will take a disastrous turn," said Fadnavis.

Tawade stressed upon the need of giving esteem to the skill-based professions and craftsmanship. He said traditional craftsmen should be provided with certifications with which they can compete in the global market opened to them by the internet.

**प्रभात** पुणे, शनिवार, दि. २८ नोव्हेंबर २०१५






**किवळे :** कौशल्य आणि मुक्त विद्यापीठाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्री गिरीश बापट, सिम्बॉयसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. एस.बी. मुजुमदार आदी.

# ... तर भारत जगात सर्वोत्तम राष्ट्र!

## मुख्यमंत्री फडणवीस : तरुणांच्या कौशल्य विकासाची गरज

**पिंपरी, दि. २७ (प्रतिनिधी)** - भारताच्या मनुष्यबळाचा योग्य वापर करायचा असेल, तर या मनुष्यबळाचा कौशल्य विकास करणे गरजेचे आहे. जपान, चीन, अमेरिका या जगातील काही प्रमुख देशातील लोकसंख्या वार्धक्याकडे झुकल्या आहे. भारत हा सर्वाधिक लोकसंख्येचा आणि तरुणांचा देश आहे. तेव्हा या तरुणांना कौशल्य विकासाचे शिक्षण मिळाले, तर भारत जगातील सर्वोत्तम राष्ट्र बनू शकेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सिम्बायोसिसच्या कौशल्य आणि मुक्त विद्यापीठाच्या भूमिपूजन आणि कोनशिलेचे अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते किवळे या येथे झाले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा पालकमंत्री गिरीश बापट, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री विनोद तावडे, माजी उच्च शिक्षणमंत्री राजेश टोपे, सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. पद्मभूषण एस.बी. मुजुमदार, आमदार बाळा भेगडे, सिम्बायोसिस मुक्त शिक्षण संस्थेच्या प्रधान संचालक डॉ. स्वाती मुजुमदार, अण्णा महाराज उपस्थित होते.

उद्योगांच्या गरजांशी कौशल्य विकासाची सांगड घालण्याची गरज असून, त्या अनुषंगाने सिम्बायोसिसने नामांकित २० कंपन्यांशी सामंजस्य करार केला आहे. यावेळी डॉ. स्वाती मुजुमदार यांनी बनविलेल्या www.edutoursim.in या संकेतस्थळाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. हे संकेतस्थळ पुण्यात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरेल. प्रारंभी डॉ. स्वाती मुजुमदार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. बी. मुजुमदार यांनी मान्यवरांचे स्वागत केले.

### मानसिकता बदलाची गरज...

उच्चशिक्षण मंत्री तावडे म्हणाले की, कौशल्य विकास हा आजचा परवलीचा शब्द झाला आहे. कौशल्य शिक्षणाविषयी बोलणारे खूप आहेत. पण हे काम प्रत्यक्षात आणण्याची कामगिरी सिम्बायोसिसने केली आहे. कोणत्याही कौशल्यात पैसा आहे. तथापि, प्रतिष्ठा नाही. ही प्रतिष्ठा मिळविण्यासाठी समाजाची मानसिकताही बदलण्याची गरज आहे. सिम्बायोसिस सुरू करीत असलेल्या कौशल्य विकासावर आधारित अभ्यासक्रमांमुळे रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होतील. त्याचप्रमाणे जागतिक बाजारपेठेतही आपल्याला जाता येईल. खेडोपाड्यात लाखो कारागीर आहेत. त्याच्या कौशल्याला प्रमाणित करण्याची गरज आहे.